International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने व उपाययोजना

**प्रा. डॉ. सतिष मैलारी कटके**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख*
*राजर्षी शाहू महाविद्यालय देवळाली प्रवरा ता. राहुरी जि. अहमदनगर*
*Corresponding Author - प्रा. डॉ. सतिष मैलारी कटके*
**DOI - 10.5281/zenodo.10952004**

**गोषवारा:**

*लोकशाही हा विषय आज सर्वमान्यता व सर्वाधिक मान्यता पावलेला व संपूर्ण जगात बहुचर्चित बनलेला आहे. सामाजिक,राजकीय,आर्थीक व न्यायिक तत्वाच्या आधारावर समाजव्यवस्था निर्माण करणे व नागरिकांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे मुलभूत वैशिष्टे लोकशाहीचे आहे. स्वातंत्र्य,समता,व न्यायावर आधारावरीत ध्येय लोकशाहीत स्पष्ट करण्यासाठी लोकांमध्ये जाणिवां निर्माण करणे आवश्यक आहे. अभ्यासातील प्राप्त निरक्षनावरून थोडीफार समाधानकारकता दिसत असली तरी सर्वसामान्य नागरिकांना लोकशाहीबाबत म्हणावी तेवढी माहीति दिसून येत नाही. म्हणून सामाजिक कार्यकर्ते, शासन व शिक्षनाच्या माध्यमातून सर्वसमावेशक व व्यापक प्रमाणात नागरिकांना लोकशाहीच्या जाणिवांना जागृत करणे आवश्यक आहे. तेव्हाच लोकशाही समोरील आव्हाने निरीक्षरता, गरिबी, लिंगभेद, जातीयवाद, धार्मिक मुलतत्वाद, प्रादेशिकता, भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, व राजकीय हिंसा या सारख्या समस्याचे सोडवणूक करण्यासाठी अनेक महत्वपूर्ण उपाययोजना उपयुक्त ठरतात.*

***कळीचे शब्द : लोकशाही, राज्यघटना, निरीक्षरता, गरिबी, लिंगभेद, जातीयवाद, धार्मिक मुलतत्वाद, प्रादेशिकता, भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, व राजकीय हिंसा.***

**प्रस्तावना**:

लोकशाही हा शासनाचा सर्वात प्राचीन प्रकार आहे. आजच्या समकालीन जगात लोकशाहीचा विचार, व्यवहार, आणि तिच्या स्वरुपात मोठे स्थितांतरे घडून आले आहेत. लोकशाही हा शासनाचा केवळ प्रकार नसून हे एक जीवनाचे तत्वज्ञान आहे. आज भारतीय लोकशाहीला ६३ वर्ष पूर्ण झाली आहेत. हा प्रवास करून जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारत देशाकडे पहिले जाते. असे असले तरी भारतीय लोकशाही समोर समकालीन आव्हाने भेडसावीत आहेत.

लोकशाहीचे बीज भारतीय संविधानात रुजले आहेत. २६ जानेवारी १९५० पासून ते आज पर्यंत

संविधानात आणि जनमानसात लोकशाहीची मूल्य गतिमान, लोकप्रिय व उत्क्रांत झाली आहेत. २१ व्या शतकात लोकशाही शासन प्रकाराला सार्वत्रिक स्वीकृती लाभली असली तरी लोकशाही विरोधी शक्ती प्रवाह प्रभावी झाल्याने लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. देशाची होणारी प्रगती नेहमी आर्थिक बाबी मध्ये मोजली जाते परंतु लोकशाही मध्ये हि अनेक महत्त्वपूर्ण समस्या विकासात अडसर निर्माण करीत आहेत. त्यामुळे लोकशाहीच्या आव्हानांना सर्वांनी खंबीरपणे समोर जाऊन त्यावर उपाययोजना करणे काळाची गरज आहे. जगातील इतर कोणत्याही देशाच्या लोकशाही पेक्षा भारताच्या घटनेने लोकशाहीचे आव्हाने अधिक सक्षमपणे सोडवणूक केली आहे.

**लोकशाहीचा अर्थ**:

लोकशाहीला इंग्रजीमध्ये Democracy असे म्हणतात. त्याची उत्पती Demos ( लोक ) आणि Cratia ( सत्ता ) या दोन शब्दापासून झाली आहे. त्याचा अर्थ लोकांची सत्ता असा होतो.

**लोकशाहीचाच्या व्याख्या**:

१. अब्राहम लिंकन “ :लोकशाही म्हणजे लोकांचे ,लोकांसाठी व लोकाकडून चालविलेले शासन होय.
२. सिली ज्या शासनव्यवस्थेत प्रत्येकाचा : .वाटा असतो ती लोकशाही होय
३. डॉलोकशाही हा : बाबासाहेब आंबेडकर . असा शासनाचा प्रकार आहे कि ज्यात सामाजिक व आर्थिक परिवर्तन शांततामय व कायदेशीर मार्गाने होते ती व्यवस्था म्हणजे लोकश ाही होय.
४. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत चालवलेली जाणारी व्यवस्था म्हणजे लोकशाही होय .

**अभ्यासाची उदिष्ट्ये**:

1. भारतीय लोकशाहीने समाजातील सर्व प्रकारच्या विषमतेचे निराकण करून सर्व नागरिकांना समान राजकीय सहभागाची संधी उपलब्ध करून दिली आहे.
2. सामाजिकआर्थिक व राजकीय न्यायाची , .प्रस्थापना लोकशाहीने केली आहे
3. लोकशाहीच्या शांततामय मार्गाने समाज व राजकीय परिवर्तन घडवून आणले आहे.

**गृहीतके**:

1. लोकशाहीच्या मुल्याबाबत लोकांच्या विचारात मतभेद आहेत.
2. लोकशाहीच्या आव्हानाबाबत लोकांची भूमिका व ओळख वेगवेगवेगळय-ा स्वरुपाची आहे.
3. कायदेमंडळन्यायमंडळ ,कार्यकारीमंडळ , व प्रसारमाध्यमे या लोकशाहीच्या घटकाबाबत लोकांची भूमिका वेग वेगळी .आहे

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत लघु संशोधानाठी दुय्यम तथ्य संकानांचा उपयोग केला आहे. त्यात निरीक्षण करून माहिती संकलित केली आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**:

संशोधन केवळ लोकशाही, राज्यघटना, गरिबी, लिंगभेद, जातीयवाद, धार्मिक मुलतत्वाद, प्रादेशिकता, भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण याबाबत आहे.

**भारतीय लोकशाही समोरील समकालीन आव्हाने :**

**गरिबी** :

देशभर पसरलेल्या बहुसंख्य गरीब दुबळ्याची स्थिती वर्षानुवर्षे वाढतच आहे.त्याच्या मुलाशी आर्थिक धोरण व आर्थिक विषमता आहे. आजही ५० टक्के लोकसंख्या अर्धनग्न, अर्धपोटी राहते व झोपते.आपल्या देशातील गरिबीची पाळेमुळे अर्थकारणा इतकीच येथील सामाजिक परिस्थितीत खोल रुजलेली आहेत. विषमता दारिद्रय , गरिबी शासनाने दुर्लक्ष केल्याने भुकेलेले व भडकलेले लोक क्रांती करून उठतात. तेव्हा लोकशाही समोरील समकालीन आव्हान म्हणून त्याकडे पाहिले जाते.

**लिंगभेद** :

भारतात सामाजिक आधारावर लिंगभेद केला जातो. महिला सोबत किंवा मुलगा/मुलगी म्हणून शिक्षणात भेदभाव केला जातो. स्त्री-पुरुष भेदभाव, सामाजीक असमानता आणि लिंगभेद असमानता समाज मानसिकता आहे. महिलांचे शोषण आणि त्यांच्यावर होणारी हिंसा त्याचे उत्तम उदारण आहे. लिंगभेद जगाच्या पातळीवर सर्वच ठिकाणी दिसून येते.महिलांना केवळ चार भिंतीच्या आत स्वतंत्र आहेत बाहेर त्यांच्यावर अनेक बंधने लादली जातात. मुल व चूल यासाठीच महिलांची निर्मिती झाली आहे. अशी संकुचित मानसिकता आज हि समाजमध्ये दिसून येते. महिला –पुरुष या दोघात अधिकार, संधी, कर्तव्ये आणि सुविधा या सर्व बाबतीत भेदभाव केले जाते हा लिंगभेदच आहे. सामाजिक रूढी, परंपरा ह्या लिंगभेदला जिवंत ठेवण्याचे काम करतात. लिंगभेदाच्या आधारावरच मुलगा-मुलगी संस्कार, शिक्षण, आरोग्य यात भेदभाव किंवा असमानता पाळली जाते. हे समाजाच्या स्वास्थासाठी अयोग्य आहे. आपल्या समाजात लहानपणा पासूनच मुलगा – मुलगी असा भेदाभेद करून लिंगभेदास खतपाणी घातले जाते. सर्वसामन्य बाबी पासून ते अधिकाराच्या बाबी पर्यंत स्त्री-पुरुष भेदभाव पाळला जातो. शिक्षण, सार्वजनिक सहभाग, आर्थिक , सामाजिक, राजकीय, आरोग्य, शेती अशा अनेक क्षेत्रात स्त्री-पुरुष भेदभाव पाळला जातो त्यामुळे भारतीय लोकशाही समोर समकालीन कालखंडात लिंगभेद आव्हान आजही कायम आहे.

**जातीयवाद** :

लोकशाही मध्ये संख्येचे राजकारण महत्वपूर्ण बनले आहे. व ज्या जातीच्या नेतृत्वाची संख्या जास्त त्याच जाजीतील समाजाच्या नेतृत्वाकडे सत्तेचे सूत्र दिसून येते. सत्ता संपादनासाठी जातीच्या संघटना निर्माण केल्या जात आहेत. राजकीय पक्षांच्या उमेदवाराची निवड, निवडणुकीतील प्रचार कताना व मंत्रिमंडळाची रचना करताना जातीचा निकष विचारात घेतला जातो. त्यामुळे जी जात नाही ती जात जी जातीय अस्मिता जोपासनाच्या नावावर जातीयवाद निर्माण करीत आहे त्यातून हि लोकशाही समोरील आव्हान म्हणून त्याकडे पाहिले जाते.

**भ्रष्टाचार** :

आज लोकशाहीला भ्रष्टाचार समस्येनी ग्रासलेले आहे. समाजात सर्वच स्तरावर गैर मार्गाने,अवैध पद्धतीने ज्यादा पैसा कमवण्याची अपप्रवर्ति वाढत आहे. राजकीय नेते व सरकारी नोकरशाही यांच्या मध्ये हि साटे लोटे होऊन भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. भ्रष्टाचारामुळे एकूण समाजात लोकशाही वरील विश्वास कमी होत आहे. कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करून कायद्यातील पाळवाटाचा आधार घेऊन निर्दोष सुटणारे नेते व अधिकारी पाहून समाज संतप्त होऊन लोकशाहीचा त्याग करावे कि काय असा विचार मनात येतो.त्यामुळे लोकशाही समोर हे एक मोठे आव्हान उभे आहे.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण** :

भारतासारख्या उच्च व आदर्श मुल्यांचा स्वीकार करणाऱ्या लोकशाहीने राजकारणातील साधन्सुचीता, नैतिक मूल्य, सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकी, सेवा त्याग, ध्येयवाद, विधायक व रचनात्मक काम करण्याची तळमळ स्वीकारली आहे. मात्र राजकारणातील गुन्हेगारीकार्णामुळे स्वार्थकेंद्रित, व्यक्तिकेंद्रित, पक्षकेंद्रित राजकारणामुळे गुंड, च्यारीत्र्यहीन, अकार्यक्षम, बेदरकर व बेजबाबदार गुन्हेगारांची राजकीय क्षेत्रातील वाढत आहे. त्यामुळे राजकारणाचा बौद्धिक, वैचारिक व मूल्यात्मक स्तर ढासळत आहे. त्यातून राजकारणाचे गुन्हेगारीकरनन हि भारतीय लोकशाहीला व विकासाला अडसर ठरत आहे.

**धार्मिक मूलतत्ववाद** :

भारत देश हा धर्मनिरपेक्ष राष्ट आहे. भारतीय संविधानानेही सर्व धर्माला समानतेची वागणूक दिली आहे. असे असून देखील धर्मातील विशिष्ठ लोक, पुरोहित, धर्मगुरू, धर्म संरक्षनाच्या नावावर धार्मिक हिंसा भडकून इतर धर्माच्या विरोधात लोकांच्या भावना भडकवतात व समाजात तेढ/ संघर्ष मिर्माण करतात. हा विचार संकुचित स्वरूपाचा असून लोकशाहीला मारक आहे. मतदारांना आपलेसे करण्यासाठी धार्मिक बाबीला अवाजवी महत्व देतात. धार्मिक मूलतत्ववाद हा बहुसंख्याक असो कि अल्पसंख्यांक दोन्ही विचार मारक व घातक स्वरूपाचे आहेत. संकुचित भौतिक

लाभासाठी लोकांच्या धार्मिक श्रद्धांचा वापर करून दोन्ही बाजूच्या भावना भडकवतात. रामजन्मभूमी कि बाबरी मशीद या सारख्या गौण प्रश्नांना अवाजवी महत्त्व देऊन जाळपोळ, लुटमार, बलात्कार, कत्तल, यासारखे निर्घुण प्रकार उभयपक्षामार्फात केले जाते. त्यातून दोन्ही बाजूची जीवित,वित्त व संसार उद्ध्वस्त होतात. त्यामुळे लोकशाहीला हे एक मोठे आव्हान उभे आहे.

**प्रादेशिकता :**

फाळणीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या विलक्षण प्रभाव संविधानकरांच्या मनावर असल्यामुळे त्यांनी राष्ट्रीय ऐक्य, स्थेर्य व सुरक्षितता या बाबींना महत्त्व देऊन भारत एकसंघ निर्माण करण्याचा प्रयत्न केले. असे असून हि भारतात नंतरच्या कालखंडात भाषा, धर्म, नेतृत्व, मागासलेपणा, भौतिक साधने या आधारावर छोट्या छोट्या घटक राज्यांची मिर्मिती झाली. त्यातून प्रादेशिकवाद निर्माण झाला. काही फुटीरवादी वृतीने देशापेक्षा प्रदेशाला अधिक महत्व दिले. त्यातुनच अन्य प्रांतीयांना प्रतिबंध, राज्यासाठी अधिक स्वायत्तेची मागणी व राज्यहीतासाठी इतराकडे दुर्लक्ष करणे हा संकुचित विचार भारतीय लोकशाहीला घातक आहे. त्यातूनच आज प्रादेशिकवादा बरोबर उपप्रादेशिकवाद हि निर्माण झाला आहे. जसे महाराष्ट्रातून विदर्भ, गुजरात मधून सौराष्ट्र, मध्यप्रदेश मधून महाकोशल, पश्चिम बंगाल मधून दार्जीलिंग असे अनेक राज्यामधून उपप्रादेशिकवाद उफाळून येत आहे आणि तोच भारतीय एकात्मतेच्या अखंडतेला व लोकशाहीला आव्हान निर्माण करीत आहेत. प्रादेशिकवाद व उपप्रादेशिकवाद मधून विकृत वळण घेऊन राष्ट्र विरोधी शक्ती बळावते त्यातून लोकशाहीच्या विकासात अडसर निर्माण होते.

**भारतीय लोकशाही समोरील समकालीन आव्हाने थांबवण्यासाठी उपाययोजना :**

**लोकशाही मूल्यावर विश्वास :**

भारतीय लोकशाही समोरील वेगवेगळी आव्हाने थांबवण्यासाठी देशातील नागरिकांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यावर विश्वास असला पाहिजे. या पद्धती विषयी लोकांच्या मनात निष्टा, आत्मीयता, श्रद्धा असली पाहिजे. कारण लोकशाही हे लोकांच्या सक्रीय सहभागावर चालणारे शाशान आहे. लोक-प्रतिनिधी-शासन या प्रकारे लोकशाहीचा प्रवास असतो. लोकशाहीत सर्व समस्या शांततेच्या मार्गाने सोडविल्या जातात. म्हणून नागरिकांनी लोकशाहीच्या मूल्यावर विश्वास ठेवल्यास अनेक आव्हानांना थांबविता येते.

**शिक्षणाचा प्रसार :**

लोकशाहीमध्ये शिक्षण महत्वाचे असते. शिक्षणाने विवेक/बुद्धिमत्ता, आत्मनिर्भरता, दूरदृष्टी व खऱ्या बाबिची जान होते. त्यातून व्यक्तिमत्वाचा विकास होतो आणि लोकशाहीच्या आव्हानांची जाणीव निर्माण होते. त्यातील धोके कळतात म्हणून जनता त्या बाबीचा सक्षमपणे सामना करतात. देशातील समस्येची माहिती होते. शिक्षणामुळे

विचार प्रगल्प होतात. तसेच इतर शासन पद्धतीपेक्षा लोकशाही शासन पद्धतीवर विश्वास वाढतो.

**राजकीय जागरूकता :**

लोकशाही समोरील समकालीन आव्हानांच्या सोडवणूकिसाठी नागरिकांमध्ये राजकीय जागरुकता असणे आवश्यक आहे. त्यात सामुदायिक जीवनाविषयी आस्था, राजकीय समस्यांना समजून घेण्याची क्षमता, लोकतांत्रिक कार्य पद्धतीविषयी ज्ञान, या सर्व बाबीचे जान असल्याने अनेक अव्व्हानांची सोडवणूक करता येते. तसेच नागरिकामध्ये राजकीय समस्यांचा गुंता निट समजून घेणे गरजेचे आहे. राजकीय पक्षाची भूमिका समजली पाहिजे व निवडणुकीत उदासीन न राहता योग्य प्रतिनिधीला मत देऊन मतदानाचा हक्क बजावला पाहिजे तेव्हाच लोकशाहीचे रक्षण होते.

**राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करणे :**

आज समकालीन कालखंडात लोकशाहीमध्ये राजकीय गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी लोकशाहीतील नागरिकामध्ये चारित्र्य शुद्ध व उत्कृष्ठ असले पाहिजे. त्याग, बलिदान, प्रमानिकपणा, देशप्रेम, आपुलकी, स्वयंपूर्णता, परस्पर सहकार्य, सहिष्णुता या आदर्श गुनातुनच राष्ट्रीय चारित्र्य निर्माण होत असते आणि यातूनच लोकशाहीचे संरक्षण होते.

**गरिबी, निरक्षरता, जातीयवाद, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, धार्मिक मूलतत्ववाद, लिंगभेद, प्रादेशिकता या समस्येचे त्वरित सोडवणूक झाली पाहिजे.**

**निष्कर्ष :**

आजही भारतीय लोकशाही समोर निरीक्षरता, गरिबी, लिंगभेद, जातीयवाद, धार्मिक मुलतत्वाद, प्रादेशिकता, भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, व राजकीय हिंसा यासारखे आव्हान भेडसावत आहेत. या सर्व आव्हानांची सोडवणूक करण्यासाठी या सर्व समस्येचे त्वरित सोडवणूक झाली पाहिजे. चांगल्या लोकशाहीसाठी सर्व नागरिकामध्ये परस्पर सहकार्य, चांगले चारित्र्य, राजकीय जागरुकता, समता, शिक्षण, नैतिकता, सहिष्णुता, बंधुभाव व लोकशाहीच्या मिल्यावर विश्वास असणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. अर्थबोधपत्रिका ,९ खंड ,अंक १० , भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी जानेवारी , .२०११

२. अर्थबोधपत्रिका,१० खंड ,अंक १० , जानेवारी ,भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी .२०१२

३. अर्थबोधपत्रिका ,१० खंड ,अंक १२ , .२०१२ मार्च ,अर्थविज्ञानवर्धिनी भारतीय

४. आधुनिक राजकीय विचारप्रणाली .डॉ , ,जळगाव ,प्रशांत पब्लिकेशन ,दिलिपसिंह .२०१५ जानेवारी

५. समकालीन भारतीय राजकारणाचे विश्लेषणमराठी ,सुहास पळशीकर , राज्यशास्त्र ,२ .वाचनसाहित्य मालिका क्र मे ,व लोकप्रशासन विभाग पुणे विद्यापीठ .२००९

६. महिला सबलीकरण ,विलास आढाव .डॉ , .२००९ ,पुणे विद्यापीठ

७. धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थितीकिशोर /प्रकाश बाळ , ,बेडकिहाळ अक्षर प्रकाशनआंबेडकर / .२००४ ,सातारा ,अकादमी

८. विचारशलाका समकालीन सामाजिक चळवळी विशेषांक ,नागोराव कुंभार .प्रा , .२०१६ ,लातूर

९. जोतीरावांची समताभास्कर ,संकल्पना - ,मुंबई ,लोकवाङ्मय गृह ,लक्ष्मण भोळे .२००९